**MHJN100003322023**

## नि.क्र.०६ वरील आदेश

(पारित दिनांक २२/०१/२०२४)

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश XXVI नियम ९ अन्वये उपअधिक्षक भूमी अभिलेख मंठा यांची नेमणूक होऊन मिळणेकरता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार (वादी) यांनी असे नमूद केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी मौजे शिरपुर, ता. मंठा, जि. जालना येथील गट क्र.३४३ एकुण क्षेत्रफळ ६ हे. ६० आर पैकी १ हे– ६५ आर या जमीनीवर प्रतिवादीने पुर्व दिशेने दक्षिणउत्तर १९ आर जमीनीवर केलेले अतीक्रमण हटवुन ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे व तो सध्या न्यायप्रविष्ट आहे.

**०३.** वादीने प्रतिवादीला त्यांच्या जमीनी व वादजमीनीची सरकारी कार्यालयामार्फत मोजणी करण्याची विनंती केली. परंतु प्रतिवादीने सदर विनंतीस मान दिला नाही व वादीसोबत अरेरावीची भाषा वापरुन तुझ्या ताब्यात जमीन जास्त निघते असे म्हणाला. त्यानंतर वादीने भुमी अभिलेख कार्यालय, मंठा येथे मोजणीची फीस जमा करुन मोजणी केली असता सदर कार्यालयाने प्रतिवादीकडे १९ आर अतीक्रमण केल्याचे सांगीतले व न्यायालयाची परवानगी असल्याशिवाय हद्द खुणा कायम करु शकत नाही असे सांगीतले. त्यानंतर वादीने दिनांक १५/०४/२०२३ रोजी प्रतिवादीस अतीक्रमण काढणेबाबत विनंती केली, परंतु प्रतिवादीने त्यास स्पष्ट नकार दिला. म्हणुन वादीने वादजमीनीची मोजणी करुन हदद खुणा कायम

करणेसाठी तसेच सदर जमीनीवर प्रतिवादीनी केलेले अतीक्रमण निश्चीत करणेकामी उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय, मंठा न्यायालयीन आयुक्त (court commissioner) म्हणुन नियुक्ती करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादीस वारंवार संधी देउनही त्याने त्याचे म्हणणे दाखल केले नाही. करीता सदरचा अर्ज प्रतिवादीविरुध्द एकतर्फा पुढे चालविण्यात आला.

०५. वादीतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०६. सदरचा अर्ज, म्हणणे व संपूर्ण संचिकेचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. तथाकथित मिळकतीवर प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचा आरोपी वादीने केलेला आहे. दावा मिळकतीवर अतिक्रमण झाले आहे किंवा नाही, ही बाब निव्वळ तोंडी पुराव्यावरुन ठरविता येणार नाही त्याकरिता सदरची बाब न्यायालयासमोर येणेकरीता त्याबाबतची मोजणी होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कोर्ट कमिशनर नेमणे क्रमप्राप्त राहिल, असे माझे मत झाले आहे. त्यामुळे दावा मिळकतीमधील तथाकथित अतिक्रमणाची बाब स्पष्ट होणेकरीता कोर्ट कमिशनर नेमणे आवश्यक वाटते. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करते.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक भूमि अभिलेख, मंठा यांची या कामी कोर्ट कमिशनर म्हणुन नियुक्ती करण्यात येते.

३. कोर्ट कमिशनर यांनी प्रत्यक्ष दावा मिळकतीच्या ठिकाणी

**MHJN100003322023**

जावुन दावा अर्जामध्ये नमूद असणा–या मिळकतीची मोजणी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल, नकाशासह सदर आदेशाची प्रत मिळालेपासुन दोन महिन्याच्या आत सादर करावा.

४. वादीने उपअधिक्षक भूमि अभिलेख, मंठा यांची नियमानुसार फी भरावी.

५. येणेप्रमाणे कमीशन याचिका पाठविणेत यावे.

स्वा/–

ठिकाण– मंठा
(श्रीमती एल. पी. धन्वे)

दिनांक– २२/०१/२०२४
प्रभारी सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मंठा